# दि शिरपूर पिपल्स को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड,शिरपूर

मुख्य कार्यालय महाराजा कॉम्प्लेक्स ,मेन रोड ,शिरपूर, जिल्हा :- धूळे -पिन-४२५४०५

फोन न.(०२५६३) २५७१७३,२९५२७१,२९५२७२ E-mail Id- spcblho@shirpurbank.co.in


==========================================================================

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

(केवळ सभासदांसाठी)

दि शिरपूर पिपल्स को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड, शिरपूर या संस्थेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि.३०/०८/२०२५,शनिवार रोजी दुपारी ५.०० वाजता " एस. एम. पटेल ऑडीटोरीयम हॉल ",फार्मसी कॉलेज कॅम्पस, करवंद नाका, शिरपूर येथे खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी बँकेचे संस्थापक अध्यक्ष मा. आ.अमरीशभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केलेली आहे. तरी या सभेस ऊपस्थित राहावे.

## सभेपुढील विषय

१) दिनांक २५/०८/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक मंजूर करणे.

३) आर्थिक वर्ष सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचा लेखा परीक्षकांचा अहवाल व दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.

४) मा.संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे सन २०२४-२०२५ च्या नफा विभागणीस मान्यता देणे.

५) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाच्या उत्पन्न-खर्चाचे अंदाजपत्रकातील कमी/जास्त झालेल्या खर्चास मान्यता देवून सन २०२५-२०२६ च्या आर्थिक वर्षासाठी संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची नोंद घेणे.

६) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी रिझर्व बँकेच्या परवानगीस अधीन राहून वैधानिक लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.

७) मा.अध्यक्षांच्या पूर्व संमतीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

बी.जे.पाटील

दिनांक : ०८/०८/२०२५ — मुख्य कार्यकारी अधिकारी

ठिकाण : शिरपूर — दि शिरपूर पिपल्स को-ऑपरेटीव्ह बँक लिमिटेड,शिरपूर

## सूचना :

१) गणपूर्ती अभावी सदरची सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी,त्याच ठिकाणी व त्याच विषयांकरिता दुपारी ठीक ५.३० वाजता सभा घेण्यात येईल.सदर सभेस गणपुर्तीचे बंधन राहणार नाही.

२) सभासदांना बँके विषयी काही प्रश्न विचारावयाचे असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात सभेच्या ३ दिवस आधी कार्यालयीन वेळेत बँकेच्या कार्यालयात पाठवावेत. तद्नंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

३) रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सभासदांनी आपले केवायसी कागदपत्रे बँकेकडे दाखल करावीत.

४) बँकेच्या सन २०२४-२०२५ ची आर्थिक पत्रके व वार्षिक अहवाल बँकेच्या मुख्य कार्यालय व शाखांचे नोटीस बोर्डवर लावण्यात आलेले आहेत. तसेच बँकेचे संकेत स्थळ www.shirpurbank.co.in येथे देखील उपलब्ध आहेत.